महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ८८ /२०२५ दि. ०२/०५/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी, नवी मुंबई** वाहतूक विभागाचे हद्दीत **दिनांक ०३/०५/२०२५ डॉ.डी.वाय.पाटील स्टेडियम, नेरुळ, नवी मुंबई या ठिकाणी ए.आर. रहमान यांच्या जागतिक दर्जाचे संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.** त्या अनुषंगाने ठाणे आयुक्तालयाच्या हद्दीतुन नवी मुंबईकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड–अवजड मालवाहतुक करणाऱ्या वाहनांना ये–जा करण्यास व पार्कीग करण्यास दुपारी १३:०० ते रात्रौ २४:०० वा.पावेतो मनाई करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे:–

| | |
|---|---|
| **कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत प्रवेश बंद –** | १) मुंबई, वसई, विरार कडून घोडबंदर रोडच्या दिशेने ठाणे कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड – अवजड वाहनांना **फाउंटन हॉटेल जवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| | २) घोडबंदर रोडने ठाणे कडे येणाऱ्या जड – अवजड वाहनांना **गायमुख जकात नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **कळवा वाहतूक उप विभागाचे हद्दीत प्रवेश बंद –** | १) बाळकुम – साकेत – नवीन कळवा ब्रिज वरुन कळवा नाका कडुन विटावा मार्गे नवी मुंबई कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **कळवा नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| | २) खारीगाव टोलनाका – गॅमन जंक्शन – पारसिक सर्कल – मुंब्रा बायपास मार्गे – नवी मुंबई कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड – अवजड वाहनांना **पारसिक सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **मुंब्रा वाहतूक उप विभागाचे हद्दीत प्रवेश बंद –** | १) पनवेल कडुन कल्याण फाटा शिळफाटा मार्गे महापे कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड – अवजड वाहनांना **शिळफाटा फाटा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **कोनगाव वाहतूक उप विभागाचे हद्दीत प्रवेश बंद –** | १) भिवंडी शहरातील जे.एन.पी.टी. नवी मुंबई कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड – अवजड वाहनांना **रांजनोली नाका येथे भिवंडी कल्याण रोडवर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| | २) ठाणे ग्रामीण सोनाळे गाव नाशिक मार्गे जे.एन.पी.टी. नवी मुंबई कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **बासुरी हॉटेल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **नारपोली वाहतूक उप विभागाचे हद्दीत प्रवेश बंद –** | १) गुजरात कडून घोडबंदर रोडच्या दिशेने ठाणे कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड – अवजड वाहनांना **चिंचोटी नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **कल्याण वाहतूक उप विभागाचे हद्दीत प्रवेश बंद –** | १) ठाणे ग्रामीण, बापगाव कडुन जे.एन.पी.टी. नवी मुंबई कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना **गांधारी नाका** येथे पडघा कल्याण रोडवर **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| | २) कल्याण शहरातील जे.एन.पी.टी. नवी मुंबई कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड– अवजड वाहनांना **पत्रीपुल** येथे कल्याण – शिळफाटा रोडवर **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **कोळशेवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत प्रवेश बंद –** | १) बदलापुर अंबरनाथ कडुन बदलापुर पाईपलाईन रोडने तसेच काटाई/बदलापुर चौक कडुन तळोजा बायपास रोडने नवी मुंबई कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड– अवजड वाहनांना **खोणी निर्सग नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |

**सदर अधिसूचना दिनांक ०३/०५/२०२५ रोजी दुपारी १३:०० ते रात्रौ २४:०० वा. पावेतो अंमलात राहील.**

CamScanner

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत मा. सविनय सादर**

जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर व रायगड जिल्हा.
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), मुंबई.
अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, मुंबई, ठाणे शहर, नवी मुंबई, मिरा–भाईंदर वसई–विरार.
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई.

**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी,**

पोलीस सह आयुक्त, वाहतूक विभाग, मुंबई.
अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग/पश्चिम प्रादेशिक विभाग, कल्याण व ठाणे,
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण/पालघर/महामार्ग पोलीस.
पोलीस अधीक्षक, रस्ता सुरक्षा महामार्ग, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे, नवी मुंबई, मिरा–भाईंदर वसई–विरार.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १ ठाणे, परिमंडळ – २ भिवंडी, परिमंडळ – ३ कल्याण, परिमंडळ – ४ उल्हासनगर, परिमंडळ – ५ वागळे इस्टेट.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे/मुंबई/मिरा भाईंदर.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.
चिंचोटी वाहतूक उप विभाग, चिंचोटी.

**प्रत :–** आयुक्त ठाणे, भिवंडी निजामपूर शहर, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका.
मुख्याधिकारी, अंबरनाथ व कुळगाव बदलापूर नगर परिषद.

**प्रत :–** मुख्य व्यवस्थापक (वाहतूक), जे.एन.पी.टी. न्हावाशेवा, नवी मुंबई.

**प्रत :–** पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.
२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी.

**प्रत :–** समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना निर्गमित करण्यात आले बाबत नोटीस मध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत :–** सर्व संबंधित वाहतूक संघटना.

CamScanner